**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१६/२०२५ मधील निशाणी क्र.११ वरील आदेश</u>**

(विनोद आहुजा वगैरे वि. कोणीही नाही)

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज हा मूळ अर्जामध्ये दुरुस्ती करुन मिळणेकामी दाखल केलेला आहे.

०२. अर्जदार यांनी मुळ अर्ज भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे वारसा दाखला मिळणेबाबत दाखल केलेला आहे. सदरकामी अर्जदार यांनी निशाणी क्र.१ मधील अर्ज कलम २ मध्ये अर्जदार यांचे वडील सौंताराम लक्ष्मणदास आहुजा यांचे नावे असणाऱ्या म्युच्युअल फंड कंपन्यामधील रक्कमेचा सविस्तर उल्लेख केलेला आहे. तथापी अर्जदार यांच्या नजरचुकीने विनंती कलमामध्ये एकूण रक्कमेचा तपशील करणेचे राहून गेलेले आहे. त्याबाबत अर्जाचे निशाणी क्र.१ मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करणे न्यायाचे दृष्टीने जरुरीचे व आवश्यक झालेले आहे. तरी अर्जाचे निशाणी क्र.१ मधील पॅरा नं.९ मधील अर्जदारच्या विनंती कलम अ मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेत यावी.

०३. अर्ज कलम ९ मधील विनंती कलम अ मध्ये सौंताराम लक्ष्मणदास आहुजा यांचे नावे अर्ज कलम १ मध्ये यामधील १ अंकास काट देवून त्याठिकाणी २ असा अंक घालणेत यावा. तसेच त्यापुढील मजकूर म्युच्युअल फंडामध्ये जमा असणारे संपूर्ण रक्कमेचे या मजकूरानंतर म्हणजेच एकूण रक्कम १५,०९,९६०.५०/- अशा एकूण रक्कमेवर अथवा सदर म्युच्युअल फंडाची आदेशावेळी होणारी बाजारभावाप्रमाणे होणाऱ्या रक्कमेचे असा जादा मजकूर समाविष्ट करण्यात येवून तशी दुरुस्ती करण्यात यावी.

०४. अर्जदार यांने मागणी केलेली दुरुस्ती ही फॉर्मल स्वरुपाची असून त्यामुळे अर्जाचे मूळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. त्यामुळे सदरचा दुरुस्ती अर्ज मंजूर करण्यात येवून वर नमूद केलेप्रमाणे निशाणी क्र.१ च्या अर्जामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेची विनंती केली आहे.

०५. अर्जदारतर्फे विद्वान विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

०६.      अर्जदारचा दुरुस्तीचा अर्ज पाहता असे दिसून येत आहे की, अर्जदारने अर्जात मागितलेली दुरुस्ती ही मूळ अर्जातील कथनांशी विसंगत नसून ती औपचारिक स्वरुपाची आहे. तसेच प्रस्तुतचे अर्जास कोणीही विरोध दर्शविलेला नाही. सदरची बाब पाहता अर्जदार यांनी मूळ अर्जामध्ये मागितलेली दुरुस्ती मंजूर करणेस कोणताही अडथळा दिसून येत असलेने मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे;

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | अर्ज निशाणी क्र.११ हा मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | अर्जदार यांनी अर्जामध्ये मागितलेप्रमाणे दुरुस्ती करावी व त्याची दुरुस्तप्रत पुढील तारखेपर्यंत अभिलेखावर दाखल करावी. |

AVINASH RAMAKANT MALVADE

Digitally signed by AVINASH RAMAKANT MALVADE
Date: 2025.12.24 17:19:53 +0530

विटा.                    (अ. र. माळवदे)

दिनांक २४.१२.२०२५.          दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, विटा,

ता.खानापूर, जि.सांगली.

*****

<u>**CERTIFICATE**</u>

I affirm that, the contents of this P.D.F file are same, word to word, as per the dictation.

| | |
|---|---|
| Name of Stenographer: | S.V. Gaikwad, (Grade-II) |
| Name of the Court - | Joint Civil Judge, Senior Division, Vita. |
| Date of pronouncement - | 24.12.2025 |
| Order signed by the Presiding Officer on - | 24.12.2025 |
| Order uploaded on - | 24.12.2025 |